महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,
दुसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

---

क्रमांक: संकीर्ण २०२३/प्र.क्र.५०५/व्यशि-१ दिनांक : १५ जानेवारी, २०२४

संदर्भ:- (१) सामान्य प्रशासन विभा, शासन निर्णय, क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र. ३०८/१६-ब, दि. २१/१२/२०१९
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. एएससी-१५१९/प्र.क्र. १९१/१४-अ, दि. १८/०१/२०२०
(३) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय, क्र. संकीर्ण ११११/प्र.क्र. ११/२०२०/व्यशि-५, दि. १६/०७/२०२०
(४) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र.२०२२/प्र.क्र.१४/व्यशि-४, दि.१९/१/२०२२
(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र.२०२२/प्र.क्र.१४/व्यशि-४, दि.१३/०६/२०२२
(६) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१९/प्र.क्र. ५८१/१६-ब, दि. १४/१२/२०२२
(७) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता चिभाग, शासन निर्णय क्र. व्यशिअ - २०२३/प्र.क्र.२२०/व्यशि-१, दि. २३/०५/२०२३
(८) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. व्यशिप्र-२०२३/आस्था-३/प्र.क्र. ५६/अधिसंख्य/का-४, दि. ०४/०९/२०२३

## शासन आदेश

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि, जात वैधता प्रमाणपत्र सादर न करु शकलेल्या कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संदर्भ क्र. (३) येथील शासन निर्णयान्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील गट क व गट ड कर्मचाऱ्यांकरीता ७४ अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली असून त्यांना संदर्भ क्र (४), (५) व (७) येथील शासन निर्णयान्वये वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर पदांना संदर्भ क्र. (६) येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार वार्षिक वेतनवाढ व इतर लाभ लागू करण्याबाबत संचानालयाने संदर्भ क्र. (८) येथील पत्रान्वये विनंती केली आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. (६) येथील शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे ज्या अधिकारी व कर्मचारी यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आले आहे अशा अधिसंख्य पदावरील अधिकारी व कर्मचारी यांना सेवाविषयक तसेच सेवानिवृत्तीचे लाभ देण्यात यावेत असे नमूद करण्यात आले आहे. संदर्भ क्र. (३) येथील शासन निर्णयान्वये संचालनालयातील एकूण ७४ कर्मचाऱ्यांना दि. १६/०७/२०२० पासून अधिसंख्य पदावर नेमणूक देण्यात आली आहे. तसेच त्यातील काही कर्मचा-यांची जुलै, २०२० व जुलै, २०२१ या वेतनवाढीचे आदेश रद्द केले असल्याने त्यांना माहे जुलै, २०२० पासूनच्या वार्षिक वेतनवाढी देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या

संदर्भ क्र. (६) येथील शासन निर्णयानुसार सदर ७४ कर्मचा-यांना जूलै, २०२० पासूनच्या वेतनवाढी देय होतील. तसेच सदर कर्मचाऱ्यांना पदोन्नती व अनुकंपा धोरण इ. लाभ वगळून इतर लाभ अदा करण्यात यावेत. त्यानुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. सदर प्रकरणी येणारा खर्च संबंधित वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून व संबंधित कर्मचा-यांचे वेतन ज्या लेखाशिर्षाखाली खर्ची नोंदविण्यात येते, त्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. हे आदेश सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१९/प्र.क्र. ५८१ए/१६-ब, दि. १४/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयतील तरतूदींनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रदीप शिवतरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत -

१. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.
२. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर. (संचालकांमार्फत)
३. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर. (संचालकांमार्फत)
४. संबंधित अधिकारी/कर्मचारी (संचालकांमार्फत)
५. निवड नस्ती (व्यशि-१)